## महिला कला—वाणिज्य महाविदयालय चांदुर (रेल्वे), जि. अमरावती

## राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम अहवाल

## सत्र २०२२—२०२३

..................................................................................................................................

विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित महिला कला—वाणिज्य महाविदयालय चांदुर—रेल्वे येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रम अहवाल:

**१. स्वच्छता पंधरवाडा कार्यक्रम**

दिनांक २५ जुलै, २०२२ ला राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकाच्यावतीने महाविदयालय परिसरात स्वच्छता करण्यात आली. तसेच स्वच्छता रॅलीचे देखील आयोजन करण्यात आले होते. या पंधरवाडयात पोस्टर स्पर्धा, स्लोगन स्पर्धा, अशा विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाविदयालयाचे प्राचार्य तसेच सर्व प्राध्यापकवर्ग उपस्थित होते.

**२. स्तनपान सप्ताह निमित्त मार्गदर्शन कार्यक्रम**

दिनांक ०६ ऑगष्ट, २०२२ ला जागतिक स्तनपान दिनामित्ताने स्तनपानाचे महत्त्व या विषयावर डॉ. सुषमा खंडार यानी सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविदयालयाच्या प्राचार्य डॉ. सीमा जगताप ह्या होत्या. यावेळी महाविदयालयातील सर्व प्राध्यापक तसेच महाविदयालयीन विदयार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

**३. क्रांतिदिनानिमीत वृक्षारोपन कार्यक्रम**

दिनांक ०८ ऑगष्ट, २०२२ ला क्रांती दिनानिमित्ताने थोर क्रांतिकारकांना वंदन करण्यात आले. तसेच महाविदयालय परीसरात वृक्षारोपन कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी महाविदयालयाच्या प्राचार्य डॉ. सीमा जगताप तसेच सर्व प्राध्यापकवर्ग, रोसेयोचे स्वयंसेवक उपस्थित होते.

**४. हर घर, तिरंगा कार्यक्रमार्तगत ध्वज वाटप**

दिनांक १० ऑगष्ट, २०२२ रोजी ‘आजादी का अमृत महोत्सव’ या कार्यक्रमातर्गत ‘हर घर, तिरंगा’ उपक्रमाअंतर्गत महाविदयालयीन विदयार्थिनींना ३०० ध्वजाचे वाटप करण्यात आले.

**५. महाराष्ट्र स्टार्टअप यात्रेला भेट**

दिनांक २० ऑगष्ट, २०२२ ला महाराष्ट्र स्टार्टअप यात्रा महाविदयालयीन विदयार्थ्यांना उदयोगाची माहिती देण्याकरीता सुरू करण्यात आली. महाविदयालयाच्यावतीने औदयागिक प्रशिक्षण संस्था चांदुर—रेल्वे येथे रासेयो स्वंयसेवकांनी भेट दिली; आणि त्यांना उदयोगाची माहिती देण्यात आली.

**६. पोषण महिना अतंर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन**

दिनांक २ सप्टेंबर २०२२, दरवर्षी सप्टेंबर महिना हा 'जागतिक पोषण महिना' म्हणून साजरा केला जातो. याचेच औचित्य साधून रोसेयोच्यावतीने महाविदयालयीन विदयार्थिनींना जनजागृती व्हावी म्हणून पोषण रॅली, रांगोळी स्पर्धा, स्लोगन स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, पोषण सुंदरी स्पर्धा असे विविध उपक्रम घेऊन जनजागृती करण्यात आली. याकरिता महाविदयालयाचे प्राचार्य तसेच सर्व प्राध्यापक व विदयार्थिनींचे सहकार्य लाभले.

**७. कॅन्सर रोगाविषयी मार्गदर्शन कार्यक्रम**

दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ ला 'कॅन्सर रोगावर' जनजागृती करण्यात आली. तसेच 'कॅन्सर व त्यावरिल उपाय' या विषयावर डॉ. अमित बेलसरे ग्रामीण रूग्णालय चांदुर—रेल्वे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा जगताप ह्या होत्या. तसेच महाविदयालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विदयार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

**८. पोषण महिनाः आनंद मेळावा**

दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ ला खाद्य पदार्थाच्या माध्यमातून आपल्या शरीराला कोणते पौष्टिक घटक महत्त्वाचे असतात हे माहीत असणे खूप महत्त्वाचे आहे. कोविड—१९ सारख्या महामारीत खानपानाला खूप महत्त्व प्राप्त झाले होते. त्याचेच औचित्य साधुन महाविदयालयातील विदयार्थिनींनकडून खाद्य पदार्थाचे स्टॉल लावण्यात आले होते. कोणत्या पदार्थात कोणते घटक असतात याची माहिती देण्यात आली व पोषण जनजागृती करण्यात आली. या आनंद मेळाव्याला महाविदयालयाच्या प्राचार्य, प्राध्यापक तसेच विदयार्थिनींनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

**९. पोलीस स्टेशन चांदुर—रेल्वे येथे रोसेयो स्वयंसेवकांनी भेट**

. दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ ला पोलीस स्टेशन चांदुर—रेल्वे येथे रोसेयो स्वयंसेवकांनी भेट दिली. त्यामधे पोलीस स्टेशनचा कारभार कसा चालतो, तसेच कायदेविषयक माहिती समजून घेतली. यामध्ये १०० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

**१०. राष्ट्रीय सेवा योजना मार्गदर्शन कार्यक्रम**

दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२ ला राष्ट्रीय सेवा योजना पथकातील स्वयंसेवकांना 'राष्ट्रीय सेवा योजना काय आहे? तसेच उदिदष्टये काय?' या विषयावर महाविदयालयाच्या प्राचार्य डॉ. सीमा जगताप यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला प्राध्यापक तसेच राष्ट्रीय सेवा योजना पथकातील स्वयंसेवक उपस्थित होते.

**११. रक्त तपासणी शिबिर**

दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ ला राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे महाविदयालयीन विदयार्थिनींकरिता रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याकरिता ग्रामिण रूग्णालय चांदुर—रेल्वे यांचे सहकार्य लाभले. या शिबिरात २०० विदयार्थिनीनी लाभ घेतला.

**१२. एडस् दिनानिमीत्त जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम**

दरवर्षी १ डिसेंबर हा 'जागतिक एडस् दिन' म्हणून साजरा केला जातो. त्याचेच औचित्य साधून रासेयोच्यावतीने दिनांक ५ डिसेंबर, २०२२ रोजी एडस् रोगाविषयी जनजागृती व्हावी म्हणून रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा व रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच 'एडस् पासून वाचण्याचे उपाय' या विषयावर डॉ. अमित बेलसरे ग्रामीण रूग्णालय चांदुर–रेल्वे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा जगताप तर प्रमुख पाहुणे सर्व प्राध्यापक होते. या कार्यक्रमास मोठया संख्येने विदयार्थिनी उपस्थित होत्या.

**१३. जागतिक महिला दिनानिमीत्त मार्गदर्शन कार्यक्रम**

८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनानिमीत्त रोसेयो च्यावतीने 'महिलांना बस व ट्रेन प्रवास करतांना येणाया समस्या व त्यावरील उपाय' याविषयावर दीपिका वाजपेयी, (स्थानक व्यवस्थापक–रेल्वे स्टेशन चांदुर–रेल्व) यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर, प्रमुख पाहुणे व सर्व प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाला मोठया प्रमाणात विदयार्थिनी उपस्थित होत्या.

**१४. मासिक पाळीविषयी मार्गदर्शन कार्यक्रम**

रोसेयोच्यावतीने महाविदयालयीन विदयार्थिनीनकरिता 'मासिक पाळी, शाप की वरदान' याविषयावर डॉ. दीपक खोडे (नॅचरल हेल्थ ॲन्ड एज्युकेशन फाऊंडेशन) यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर, हे होते. तर या कार्यक्रमास सर्व प्राध्यापक उपस्थित होते. तसेच मोठया प्रमाणात विदयार्थिनीही यावेळी उपस्थित होत्या.

**१५. जागतिक वनदिन साजरा**

दिनांक २१ मार्च, हा दिवस 'जागतिक वनदिन' म्हणून साजरा केला जातो. रोसेयोच्यावतीने महाविदयालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर, प्राध्यापक व रोसेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

| | |
|---|---|
| कार्यक्रम अधिकारी | प्राचार्य |
| (प्रा. अनिता एस. धुर्वे) | (डॉ. अशोक पळवेकर) |

....................................

## नियमित कार्यक्रम फोटो

## सत्र २०२२—२०२३

## स्वच्छता पंधरवाडा कार्यक्रमानिमीत्त रॅलीचे आयोजन




## पोस्टर स्पर्धा



## क्रांतिदिनानिमीत वृक्षारोपन कार्यक्रम




## हर घर, तिरंगा कार्यक्रमार्तगत ध्वज वाटप



## महाराष्ट्र स्टार्टअप यात्रेला भेट




## कॅन्सर रोगाविषयी मार्गदर्शन कार्यक्रम




महिला कला वाणिज्य महाविद्यालय
चांदुर रेल्वे
राष्ट्रीय सेवा योजना
GPS Map
Camera Lite
Chandur Rly. Bus Depot, Railway Station Road, Chandur Railway, Maharashtra 444904, India
Latitude
20.8088739°
Longitude
77.9822518°
Local 02:11:10 PM
GMT 08:41:10 AM
Altitude 0 meters
Wednesday, 21-09-2022

रक्त तपासणी शिबिर


2022.11.24 15:51

# एडस् दिनानिमीत्त जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम






## जागतिक महिला दिनानिमीत्त मार्गदर्शन कार्यक्रम




## मासिक पाळीविषयी मार्गदर्शन कार्यक्रम



# जागतिक वनदिनानिमित्त वृक्षारोपण




..........................

वर्तमान पत्र कात्रणे

शुक्रवार, दि. १० मार्च २०२३ ww

# चांदुर-रेल्वे येथील महिला महाविद्यालयात जागतिक महिला दिन साजरा




चांदूर रेल्वे दि. ९ : येथील महिला कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्यावतीने दि. ८ मार्च रोजी 'जागतिक महिला दिनानिमित्त' मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून दीपिका वाजपेयी (स्थानक व्यवस्थापक, रेल्वे-स्टेशन, चांदुर-रेल्वे) या उपस्थित होत्या. यावेळी डॉ सीमा जगताप, डॉ. गजानन वेले, प्रा. संजीव भुयार, प्रा. नीलिमा टिचुकले यांची प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थिती होती.

याप्रसंगी दीपिका वाजपेयी यांनी 'महिलांना बस व ट्रेनमध्ये प्रवास करताना येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाय' या विषयावर मार्गदर्शन केले, तर प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर यांनी 'आपल्या भारतीय समाजात पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या प्रभावाने स्त्रीचे मानवीपण अव्हेरून तिला दुय्यम स्थान दिले आणि तिच्या अस्तित्वाला वस्तुमयाचा जो अर्थ बहाल केला आहे, तो अमानवीय आहे, असे सांगत आपण आपल्या धर्मसत्ताक आणि पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या प्रभावाने संस्कारित झालेली आपली मानसिकता बदलून भारतीय संविधानाच्या चौकटीतील स्त्री-समानतेच्या आशयाचा अर्थ समजून घेतला पाहिजे' असेही आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्रतिपादन केले ; आणि महिला दिनाच्या औचित्याचे यथार्थ विवेचन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोसेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिता धुर्वे यांनी केले. सूत्रसंचालन कु. निर्जला वासनिक यांनी तर आभार प्रदर्शन सपना कांबळे हिने केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# महिला महाविद्यालयात 'स्त्रियांची मासिक पाळी' या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम

चांदुर-रेल्वे दि. १२ : येथील महिला कला-वाणिज्य महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी त्यांच्या अभ्यासक्रमाच्या व्यतिरिक्त 'नॅचरल हेल्थ अँड एज्युकेशन फाऊंडेशन आणि स्मार्ट चॉईस' यांच्या सहकार्याने 'महिलांची मासिक पाळी : समज-गैरसमज' या विषयावर एक जनजागृतीपर कार्यक्रम नुकताच घेण्यात आला. या प्रसंगी डॉ. दीपक खाडे यांनी प्रस्तुत विषयावर उपस्थित मुली व स्त्रियांना सविस्तर मार्गदर्शन केले.

महिलांची मासिक पाळी हा समाजातील एक संवेदनशील विषय आहे. या विषयाचे गांभीर्याने लक्षात घेऊन समाजात रुढी व परंपरेच्या नावाखाली चालत आलेले मासिक पाळी बद्दलचे समज व गैरसमज दूर करणे गरजेचे आहे. तसेच समाजात स्त्रियांच्या मासिक पाळी संबंधी असलेल्या अनेक अंधश्रद्धा लक्षात घेऊन त्या दूर करण्यासाठी आपण प्रयत्न करण्याची नितांत आवश्यकता आहे. सोबतच मासिक पाळीच्या दिवसांत



स्त्रियांनी घ्यावयाची काळजी आणि बाजारात उपलब्ध असलेल्या प्लास्टिक सॅनिटरी नॅपकिनमुळे महिलांना होणाऱ्या विविध आजारांपासून दूर राहण्यासाठी 'जैविक सॅनिटरी नॅपकिन'चा वापर करणे कसे गरजेचे आहे, यासंबंधीचे सविस्तर मार्गदर्शन डॉ दीपक खाडे यांनी प्रस्तुत कार्यक्रमात केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या आयक्यूएसी समन्वयक प्रा. सीमा जगताप आणि गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. अनिता धुर्वे यांनी आयक्यूएसी व गृहअर्थशास्त्र विभागाच्यावतीने संयुक्तरीत्या या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंगणवाडी कार्यकर्ती सौ. सीमा बोडखे यांनी विशेष प्रयत्न केले.

'स्त्रियांची मासिक पाळी' या विषयावर डॉ. खाडे यांच्या संस्थेच्यावतीने आत्तापर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात शाळा-महाविद्यालये, गाव-पाडे इत्यादी ठिकाणी वेगवेगळ्या संस्थांच्या सहकार्याने १५०० पेक्षा अधिक जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात आले. मासिक पाळीसारख्या विषयावर बऱ्याचदा महिला आणि मुलींमध्ये उदासीनता दिसून येते. परंतु या कार्यक्रमाला मुली व शिक्षिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाला डॉ. प्रदीप दंदे, डॉ. गजानन वेले, प्रा संजीव भुयार, डॉ. अतुल वानखेडे, प्रा. नितीन अंभोरे, प्रा रश्मी खेळकर, प्रा नीलिमा टिचुकले यांच्यासह अंगणवाडी सेविका अरुणा आठवले, शारदा राऊत, शीतल कुबडे, कु. संजिवा पारठे, वत्सला सोनटक्के ही सर्व मंडळी प्रामुख्याने उपस्थित होती. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थिनींही या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या.

## ण सेवा
## द्वारा प्रशंसा

शोधप्रबंध सुद्धा सादर करण्यात आलेले आहेत . त्यांनी वडीलांच्या